महाराष्ट्र शासन

क्रमांक: अप्रउ-२००४/४४१/प्र.क्र.१२३/नवि-६
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ ऑगस्ट, २००४

प्रति,
सर्व महापालिका आयुक्त.
आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व क्षेत्रिय विकास प्राधिकरण, मुंबई.
सर्व नगरपालिका मुख्याधिकारी.

विषय : महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रासाठी राष्ट्रीय बांधकाम संहिता भाग-४ लागू करणेबाबत....

महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व सुरक्षितता विधेयक राज्यात लागू करण्यासाठी प्रारुप तयार करण्यासाठी शासनाने उच्चस्तरीय उप समिती नियुक्त केली असून यथावकाश केंद्र शासनाची मान्यता घेऊन त्यास विधी मंडळाची मान्यता मिळविण्यांत येईल.

२. दिनांक १५ जुलै, २००४ रोजी प्रधान सचिव-२ (नवि) यांनी आयोजित केलेल्या आयुक्तांच्या बैठकीत राज्याचे अग्निशमन सल्लागार यांनी सदर विधेयकातील तरतुदी आणि आगीसारख्या दुर्घटनांचा मुकाबला करण्यासाठी महापालिका काय कारवाई करु शकते याविषयी त्यांनी विवेचन केले होते. सदर बैठकीत केंद्र शासनाने १५ मीटरपेक्षा उंच असलेली इमारत ही हायराईज बिल्डिंग आहे अशी व्याख्या केली असून ती राज्यात सर्वत्र लागू करण्याबाबत उपस्थितांनी मान्यता दिली होती. सदर बैठकीत ठरल्यानुसार महापालिकांनी यापुढे विकासकास राहण्यासाठीचे ना-हरकत प्रमाणपत्र / ओ. सी. देण्यापूर्वी अग्निसुरक्षेची सर्व उपाययोजना केली असल्याची खात्री करणे आवश्यक असून त्यानुसार प्रचलित पध्दतीत बदल करणे शक्य व्हावे यासाठी राष्ट्रीय बांधकाम संहिता भाग-४ ची प्रत सोबत जोडली आहे.

३. सबब सर्व महापालिका आयुक्त व नगरपरिषद मुख्याधिका-यांना सूचित करण्यांत येते की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारच्या औद्योगिक, वाणिज्यिक, सांस्कृतिक संस्थांच्या इमारती, निवासी हॉटेल्स, उपाहारगृहे, मोठी सभागृहे, चित्रपटगृहे, शॉपिंग मॉल, शासकीय / निम शासकीय इमारती, रुग्णालये, निवासी संकुल व इतर संवेदनाशील इमारती तसेच १५ मीटरपेक्षा उंच निवासी इमारतींबाबतीत राष्ट्रीय बांधकाम संहिता भाग-४ मधील सर्व तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. अशी अंमलबजावणी करतांना काही अडचणी उद्‌भवल्यास अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई-४०० ०९८, फॅक्स क्रमांक २६६७०८१९ व संपर्क साधावा.

सहपत्र-एक

(म. दि. आडिवरेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-
आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, मुंबई.